प्रेस नोट

१४ डिसेंबर २०२१

मुंबई : मुंबई वाहतूक नियंत्रण शाखा आणि ब्लूमबर्ग फिलांथ्रोपीज इनीशियेटीव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) यांचे सहकार्याने आज मंगळवारी मुंबई रोड सेफ्टी वार्षिक अहवाल,२०२० प्रसिद्ध झाला असून त्यात मुंबईत मागील सलग सहा वर्षात प्राणघातक अपघातात घट झालेली दिसून येते. या वार्षिक अहवालात मुंबईतील रस्ते अपघातांची आकडेवारी दिलेली असून ही माहिती रस्ते सुरक्षा उपाययोजनाबाबत निर्णय घेणाऱ्या सर्वासाठी उपयुक्त ठरेल.

" मुंबई रस्ते सुरक्षा वार्षिक अहवाल २०२०" हा अहवाल श्री. हेमंत नगराळे, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांनी आज गुन्हे परिषदेत प्रकाशित केला. यावेळी श्री. हेमंत नगराळे, भापोसे, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांनी सांगितले वाहतूक नियंत्रण शाखेने ब्लूमबर्ग फिलांथ्रोपीज इनीशियेटीव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) या संस्थेसोबत गेली सात वर्षे जवळून काम केले असून रस्ते अपघात कमी करण्याबाबत उत्तम उपाययोजना केल्या आहेत. या संयुक्त कामगिरीसाठी मी त्यांना शुभेच्छा देऊन या भागीदारीतून पुढे आणखी प्रगती होईल अशी आशा बाळगतो. तसेच रस्त्यावरील प्रत्येक प्राणघातक अपघात टाळण्यासाठी मुंबई पोलीस सर्वेतोपरी प्रयत्नशील रहातील " असे पोलीस आयुक्त श्री. हेमंत नगराळे यांनी सांगितले.

सन २०२० मध्ये कोविड लॉकडाऊनमुळे एकूण रस्ते अपघातात जरी लक्षणीय घट झाली असली तरी ३५० नागरिकानी रस्ते अपघातात प्राण गमावले. सन २०१० पासूनची रस्ते अपघात आकडेवारी पाहिल्यास असे दिसून येते की गेल्या दहा वर्षात प्राणघातक अपघातात एकूण ४५% ने घट झाली असून विशेषकरून त्यातील ४३% घट सन २०१५ पासून झालेली आहे. सन २०१९ ते २०२० या कालावधीत प्राणघातक अपघातातील घट २२ टक्के इतकी होती.

श्री. सत्य नारायण,भापोसे, अतिरिक्त पोलीस आयुक्त ( वाहतूक ) यांनी सदर अहवालातील मुख्य निष्कर्ष पोलीस आयुक्त व अन्य अधिकाऱ्याना विषद केले. तसेच परिषदेतील सहभागी अधिकारी यांना ब्लूमबर्ग फिलांथ्रोपीज इनीशियेटीव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) या संस्थेबाबत माहिती सांगितली.

श्री.राजवर्धन,भापोसे, सह पोलीस आयुक्त- मुंबई वाहतूक शाखा म्हणाले की " या अहवालामुळे रस्ते सुरक्षेबाबत कोठे तात्काळ उपाययोजना कश्या रीतीने केंद्रित कराव्यात हे समजते. कोविड साथीमुळे रस्ते अपघात जरी कमी झाले असले तरी गेली काही वर्षे प्राणघातक अपघातांत होणारी घट ही सकारात्मक बाब आहे. हे यश अहवालातील आकडेवारी, पुरावे आधारित निर्णय प्रक्रिया आणि त्यानुसार केलेल्या उपाय-योजना यातून मिळालेले असून यापुढे देखील रस्तेसुरक्षेसंबंधी सर्व शासकिय घटकांशी समन्वय साधून रस्ते अपघातांची संख्या आणखी कमी करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू ."

या अहवालात रस्त्यावरील असुरक्षित वापरकर्ते उदा. पादचारी, सायकल चालक, मोटरसायकल चालक आणि तीनचाकी वाहनातील प्रवासी जे रस्ते अपघातील एकूण मयतांच्या ९३% आहेत, त्यांचेवर लक्ष वेधले आहे. सन २०२० मध्ये रस्ते अपघातात मरण पावलेल्यात दोन/ तीन चाकी वाहनचालक (३९%), प्रवासी (१०%) आणि त्याचबरोबर पादचारी (४२%) असे होते. त्याचे अगोदरच्या वर्षी रस्ते अपघातात मरण पावलेल्यात पादचार्यांची संख्या सर्वाधिक होती. सन २०२० मध्ये कोविड कालावधीत रस्त्यावर कमी फिरणारे पादचारी किंवा संचारबंदी यामुळे हा बदल झाला असावा. सन २०१९ मध्ये रस्ते अपघातात मरण पावलेल्यात सर्वाधिक पादचारी (४७%) आणि दोन/तीन चाकी वाहनचालक (४१%) इतके होते.

डॉ.सारा व्हाईटहेड, Public Health &Preventive Medicine Consultant, Vital Strategies यांनी कॅनडा येथून व्हिडीओ संदेशामार्फत सांगितले की, गेल्या दशकात मुंबईत शहरातील प्राणघातक अपघातात होणारी संयत घट असे दर्शविते कि रस्ते सुरक्षेतील उपाययोजना अंमलात आणल्या जात आहेत. जर प्राप्त आकडेवारीचा अभ्यास करून रस्ते अपघातामागील कारणे आणि त्यावरील उपाययोजना केल्या तर आपण आणखी मनुष्यहानी वाचवू शकू. आम्हाला मुंबईतील रस्ते सर्वांसाठी सुरक्षित करण्यासाठी मुंबई वाहतूक पोलिस आणि अन्य घटकांना मदत करण्याबद्दल अभिमान आहे.

**वार्षिक अहवालातील ठळक वैशिट्ये**

१. सन २०१० पासून प्राणघातक रस्ते अपघातात ४५% घट, सन २०१५ पासून ४३% घट आणि सन २०१९ पासून २२% घट. सन २०२० मध्ये रस्ते अपघातात एकूण ३५० नागरिक मृत्यू पावले . तुलनात्मकदृष्ट्या ही संख्या सन २०१९ मध्ये ४४७, सन २०१५ मध्ये ६११ आणि सन २०१० मध्ये ६३७ होती.

२. सन २०२० मधील रस्ते अपघातात मरण पावलेल्यापैकी ९३% असुरक्षित वापरकर्ते (उदा. पादचारी, सायकल चालक, मोटरसायकल चालक आणि तीनचाकी वाहनातील प्रवासी होते.

३. सन २०२० मधील एकूण प्राणघातक रस्ते अपघातातील ४२% अपघात Hit & Run प्रकारचे होते ज्यात ५७% लोकांनी जीव गमावले.

४. सन २०२० मध्ये प्राणघातक अपघातात मरण पावलेल्यापैकी सर्वात जास्त हिस्सा (४१%) वय २० ते ३४ वर्षे या तरुण वयोगटातील होता.

५. सन २०२० मध्ये रस्ते अपघातात मरण पावलेल्यापैकी मोठी संख्या पुरुष व्यक्तीची ( ८७%) होती तसेच याच वर्षातील एकूण प्राणघातक अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकात ९९% पुरुष चालकच होते.

६. सन २०२० मधील लॉकडाऊन कालवधीत रस्ते अपघातात मृत्युमुखी किंवा जखमी झालेल्यांच्या संख्येत लक्षणीय घट झाली.

७. अति जोखमी रस्ते : घाटकोपर- माहूल मार्ग, घाटकोपर फ्लाय ओव्हर, आशा नगररोड या ठीकाणी सर्वाधिक प्रति कि.मी. मृत्यू झाले. या मार्गावर सुरक्षित रस्ते संरचना (Safer Street Designs) चा अवलंब केल्यास तेथील प्राणघातक अपघात कमी होऊ शकतील.

८. अति जोखमी रस्ते जंक्शन : अमर महाल जंक्शन, गोदरेज जंक्शन आणि पूर्व द्रुतगती मार्ग- JVLR जंक्शन या ठिकाणी सन २०२० मध्ये सर्वाधिक प्राणघातक अपघात व जखमी झाले.

९. अति जोखमी पोलीस झोन : सन २०२० मध्ये पोलीस परिमंडळ सहा आणि सात कार्यक्षेत्राय सर्वाधिक वाहन अपघात झाले. दुचाकी वाहनाचे अपघात पोलीस परिमंडळ सात आणि आठ कार्यक्षेत्राय झाले तर परीमंडळ सात कार्यक्षेत्रात सर्वाधिक पादचारी रस्ते अपघातात मृत्युमुखी पडले.

सन २०१५ मध्ये मुंबई शहराने ब्लूमबर्ग फिलांथ्रोपीज इनीशियेटीव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी (BIGRS) यांचे सोबत काम सुरु केले. सन २०२० मध्ये BIGRS संस्थेने आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यभर वाढविले आणि आता त्यात दिल्ली व बेंगलुरू या शहरांचा समावेश झाला आहे. जगभरातील ३० शहरे या उपक्रमात काम करीत आहेत.

सदर अहवाल मुंबई वाहतूक नियंत्रण शाखा त्याचे वेबसाईट वर प्रसारित करतील जो सर्व नागरिकांसाठी उपलब्ध होईल तसेच तो सर्व शासकीय विभागांना दिला जाईल. जेणेकरून संबंधित विभाग त्यांचे कार्यक्षेत्रात योग्य त्या सुधारणा करू शकतील.